पुढारी

# शिवाजी विद्यापीठात पुनर्प्रवेश परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अधिविभाग-महाविद्यालयातील अभ्यासक्रमांच्या रिक्त राहिलेल्या जागांसाठी पुनर्प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात विद्यापीठ अधिविभागातील १४ अभ्यासक्रमांसाठी दि. २० सप्टेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजल्यापासून ही प्रवेश परीक्षा होणार आहे. यासाठी सीमाभागातील विद्यार्थ्यांसह इच्छुकांनी दि. १८ सप्टेंबरपर्यंत www.unishivaji.ac.in या संकेत स्थळावर भेट देण्याचे किंवा ०२३१-२६०९१४२, २६०९४८८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

सकाळ

# स्पर्धा परीक्षेसाठी विद्यापीठात केंद्र सुरू

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे प्रवेश सुरू झाले आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा अर्ज ऑफलाईन/ऑनलाईन पद्धतीने मागविण्या येणार आहेत. हे अर्ज शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) आणि केंद्राच्या कार्यालयात उपलब्ध आहेत. २१ सप्टेंबरपर्यंत प्रवेश अर्ज आवश्यक कागदपत्रासह केंद्रांच्या (Email ID- cceis@unishivaji.ac.in) वर पाठवून द्यावेत. तसेच केंद्राच्या कार्यालयात सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.०० पर्यंत जमा करावेत. प्रवेश परीक्षा ही २८ सप्टेंबरला दुपारी १२.०० ते १.३० या वेळेत ऑफलाईन पद्धतीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात मानव्यशास्त्र इमारत, शिवाजी विद्यापीठात होणार आहेत.

सकाळ

# नॅनोसायन्स विद्यार्थिनींची परदेशात संशोधनासाठी निवड



मधुरा देशपांडे



वैष्णवी सावेकर



रोहिणी शिंदे

कोल्हापूर, ता. १४ : स्कूल ऑफ नॅनोसायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी या अधिविभागातील तीन विद्यार्थिनींची युनायटेड किंगडम आणि दक्षिण कोरियातील विद्यापीठांमध्ये उच्च विद्यावेतनासह मास्टर्स आणि पीएच. डी. साठी निवड झाली आहे. युनायटेड किंगडममधील युनिव्हर्सिटी ऑफ शेफफिल्ड येथे वैष्णवी अशोक सावेकर (राधानगरी) यांची सेमीकंडक्टर फोटोनिक्स आणि इलेक्ट्रॉनिक्स या विषयात मास्टर्स (पदव्युत्तर) अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे. दक्षिण कोरियातील चुंग-आंग विद्यापीठ येथे मधुरा प्रदीप देशपांडे (पुणे) यांची पीएच.डी.साठी निवड झाली. रोहिणी हणमंत शिंदे (इस्लामपूर, सांगली) यांची एम.एस्सी.-पीएच.डी. एकात्मिक अभ्यासक्रमासाठी निवड करण्यात आली आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्यासह प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा व सर्व शिक्षकांनी, सर्व विद्यार्थिनींचे अभिनंदन केले.

सकाळ

# संशोधक विद्यार्थ्यांना सैफ सेंटर अनोखे केंद्र

## प्रा. डॉ. सोनकवडे; 'स्तुती' प्रशिक्षण कार्यक्रम

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठात स्तुतीअंतर्गत सुरू असलेल्या आठवडी प्रशिक्षण कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी सहभागी शिक्षक संशोधक विद्यार्थी यांना प्रथम सत्रात संजय घोडावत विद्यापीठाचे डॉ. संभाजी पवार यांनी 'सोलर सेल' या विषयावर मार्गदर्शन केले. विविध संकल्पनांचा विज्ञान व तंत्रज्ञानात कसा उपयोग करावा, याबाबतची माहिती दिली. दुसऱ्या सत्रात डॉ. डी. एस. भांगे यांनी एक्सआरडी उपकरणावर नमुने तपासणीविषयी माहिती दिली.

स्तुती कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी डी. वाय. पाटील संस्थेचे डॉ. जे. एल. गुंजकर यांनी 'नॅनो हायब्रीड मटेरियल'विषयी माहिती दिली. ऊर्जा आणि पर्यावरणीय विषयांसाठी नॅनो हायब्रीड मटेरियलचे उपयोग याविषयी चर्चा झाली. दुसऱ्या सत्रात प्रा. ए. व्ही. घुले यांनी 'अॅडव्हान्सेस ओन थर्मल अनालिसीस', त्यानंतर सर्व सहभागी शिक्षक, प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी यांना SAIF DST CFC येथील उपकरणांचे गटानुसार प्रात्यक्षिक दिले गेले. सहभागीपैकी काहींनी आणलेले सॅम्पल येथे टेस्ट करून दिले. याच प्रकारे रोज सायंकाळी विविध उपकरणे सहभागींना प्रत्यक्षपणे हाताळायला मिळणार आहेत.

15 SEP 2022 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महावीर अध्यासनास जैन सेवा संघातर्फे देणगी

## इमारतीच्या बांधकामासाठी दिली १ लाख ११ हजार ११ रुपये देणगी

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासन केंद्रामार्फत १३ कोटी खर्च करून भव्य वास्तू उभारली जाणार आहे. यातून जैनधर्माचे शास्त्रीय संशोधन व युवकांना मार्गदर्शन यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरापर्यंत कार्य केले जाणार आहे.

या कार्यासाठी जैनसेवा संघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेषत: सुरेश मगदूम, डॉ. महावीर मिठारी, अतुल पाटणे, संदीप अथणे, अजय कोले, भारत वणकुद्रे यांनी मिळून जैनसेवा संघामार्फत भगवान महावीर अध्यासनास १ लाख ११ हजार १११ रुपये देणगी दिली. जैनसेवा संघ, कोल्हापूर गेली २० वर्षे सातत्याने युवकांमध्ये विविध प्रकल्पातून धर्मभावना व सामाजिक बांधिलकी जोपासत आहे.




**कोल्हापूर : जैन सेवा संघातर्फे शिवाजी विद्यापीठातील महावीर अध्यासन केंद्राच्या इमारतीसाठी आर्थिक मदत निधी देण्यात आला. सेवा संघाचे पदाधिकारी आणि डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. विजय ककडे उपस्थित होते.**

भगवान महावीर अध्यासनाच्या निधी संकलन समितीचे अध्यक्ष जे. एफ. पाटील व इतर सदस्यांनी आभार मानले. अध्यासनाच्या इमारतीची देणगी प्राप्तिकर सवलत पात्र असून, सर्व व्यक्ती व संस्थांनी कार्यास देणगी द्यावी, असे आवाहन भगवान महावीर अध्यासनाचे डॉ. विजय ककडे यांनी केले आहे. या बृहत देणगीबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी जैन सेवा संघाचे आभार मानले आहेत.

तरुण भारत

# स्तुती प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांचा आनंद व्दिगुणीत



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठांतील सैफ सेंटरमधील १४ वेगवेगळ्या अत्याधुनिक उपकरणांविषयी माहिती देत, या उपकरणांचा उपयोग संशोधक विद्यार्थी, प्राध्यापक व औद्योगिक क्षेत्राला कशाप्रकारे होईल याविषयी सैफचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी माहिती दिली. जीसीएमएसएमएसचे इंजिनिअर वरुण कोळी यांनी फार्मस्टिकल सायन्सेस, फिजिकल सायन्सेस तसेच औद्योगिक क्षेत्राला या उपकरणाचा कशाप्रकारे फायदा होतो याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. सोनकवडे यांनी विद्यार्थ्यांच्या मनातील आत्याधुनिक उपकरणांविषयी असलेल्या शंकांचे निरसन केले. अत्याधुनिक उपकरणे संशोधक विद्यार्थ्यांना हाताळण्यासाठी कशी प्राप्त करता येतील याविषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांनी भारत सरकार व विद्यापीठाचे या उपक्रमाबद्दल आभार मानले.